विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १४३ / २०१९

वीज पूरवठा वारंवार खंडीत होण्याबाबत

नथू सदू चव्हाण ..... अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, वाई (महावितरण) ..... प्रतिवादी

उपस्थिती

अपिलार्थीतर्फे :- नथू सदू चव्हाण

प्रतिवादीतर्फे :- १) संजय सोनवळकर, कार्यकारी अभियंता, वाई

२) निरज देशमुख, सहाय्यक अभियंता, केंजल

कोरम : दिपक लाड

आदेश पारीत दिनांक :- २८ ऑगष्ट २०१९

आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ (यापुढे ज्याचा उल्लेख "ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६" असा केला जाईल) मधील विनियम १७.२ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण बारामती परिमंडळ (यापुढे ज्याचा उल्लेख "मंच" असा केला जाईल) यांच्या दिनांक ३ जुलै २०१९ च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थी ग्राहकाने सदरचे अभिवेदन दिनांक १९ जुलै २०१९ रोजी दाखल केलेले आहे.

२. मंचाने दिनांक ३ जुलै २०१९ रोजीच्या आदेशान्वये ग्राहकाची तक्रार नामंजूर केलेली आहे.

३. मंचाच्या आदेशाने समाधान न झाल्याने अपिलार्थी ग्राहकाने दाखल केलेल्या अभिवेदनात नमुद केले आहे की, अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक १९ जुलै २००३ पासून घरगुती ग्राहक (क्रं.१९३०६१९६४०९९) आहेत. वीज पुरवठा वारंवार खंडीत झाल्यावर नजीकच्या संबधीत लाईनमनला फोन करून कळवित असतात. परंतू तक्रारींची गांर्भीयाने नोंद घेतल्या जात नाहीत. वारंवार वीज खंडीत झाल्यामुळे फार मनस्ताप होतो. शाखा कार्यालयाकडे सुध्दा याबाबत तक्रारी केल्या आहेत. परंतू वीज खंडीत होण्याचे प्रमाण कमी होण्याऐवजी सद्या वाढतच चालले आहे. अपिलार्थी यांनी महावितरण मंडल कार्यालय सातारा येथे वीज पुरवठा सातत्याने खंडीत होत असल्याबाबत दिनांक १४ जुन २०१८ रोजी तक्रार दाखल केली. भारनियमन किंवा काही तांत्रीक कामे करावयाची असल्यामुळेच वीज पुरवठा वारंवार खंडीत केला जातो, असे महावितरणकडुन सांगण्यात आले. जेव्हा वीज पुरवठा खंडीत होतो तेव्हा तो पुर्ववत होण्यास भरपूर कालावधी जातो. अपिलार्थी यांनी असेही नमुद केले आहे की, जेव्हा जेव्हा वीज पुरवठा खंडीत होतो तेव्हा तेव्हा त्याची नोंद घेणारी महावितरण कंपनीची स्वयंचलीत यंत्रणा असती, म्हणजे आमच्या तक्रारीची गंभीरता महावितरणच्या लक्षात आली असती. परंतू अशी यंत्रणा महावितरण कार्यालयाकडे नाही हे प्रतिवादीचे म्हणने आहे. वीज पुरवठा वारंवार खंडीत होतो म्हणून २४ तास वीज पुरवठा मिळावा व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०१४ (कृतीची मानके, विनियम २०१४) नुसार नुकसान भरपाई मिळावी म्हणून अंर्तगत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार केली. कक्षाने दिनांक ६ जुलै २०१८ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता वाई यांना सुचना केल्या की, कंपनीच्या नियमानुसार उचीत कार्यवाही करून तक्रारदारास तसे कळवावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महावितरणच्या

कार्यालयास दिनांक १६ जुलै २०१८ पूर्वी देण्यात यावा. कक्षाने तक्रार अर्जावर गांभीर्याने निर्णय घेतला नाही.

अपिलार्थी यांनी मंचाकडे दिनांक २२ एप्रिल २०१९ रोजी तक्रार केली असता मंचानेही दिनांक ०३ जुलै २०१९ रोजीच्या आदेशान्वये ग्राहकाची तक्रार नामंजूर केली. अपिलार्थी यांनी नमुद केले की, गावठाण फिडरवर वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण नगण्य असल्यामुळे अपिलार्थी यांना गावठाण फिडरवरून प्रतिवादी यांच्या खर्चातून वीज पुरवठा देण्यात यावा. २४ तास वीज पुरवठा मिळण्याचा अपिलार्थी यांचा हक्क आहे. अपिलार्थी ने आपल्या अभिवेदनामार्फत खंडीत वीज पुरवठयामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई नाही मिळाली तरी चालेल परंतू २४ तास अखंडीत वीज पुरवठा मिळावा अशी मागणी केली.

४. प्रतिवादी यांनी दिनांक २ ऑगष्ट २०१९ च्या उत्तरात नमुद केले आहे की, अपिलार्थी अर्जदार यांचे घर गावठणात नसुन ते शेतात आहे व त्यांना दिनांक १९ एप्रिल २००३ रोजी घरगुती वापरासाठीचे वीज कनेक्शन देण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र शासन व महावितरणच्या गावठाण वीज वाहिनी आणि कृषीपंप वीज वाहिणी विलगीकरण (Agriculture Feeder Separation) योजनेअंर्तगत सन २०११-१२ मध्ये गावठाण वीज वाहिनी व कृषी पंप वीज वाहिनी यांची कामे या भागात करण्यात आलीत. गावठाण क्षेत्रातील घरांना गावठाण फिडर करून घरगुती व इतर वीज कनेक्शन दिली आहेत, तर वाडीवस्तीवरील घरगुती ग्राहकांची वीज जोडणी प्रामुख्याने कृषी पंप फिडरवरच ठेवण्यात आली. शेतीतील घरांना किवा छोटया वाडयांसाठी गावठाण वाहिनीवर स्थलांतरीत करण्याकरीता लागणाऱ्या लघुदाब वाहिनीच्या पोलची संख्या जास्त लागत असल्यामुळे अश्या जोडण्या कृषी पंप वाहिनीवरच ठेवण्यात आल्यात.

अपिलार्थीला २२ केव्ही कृषीपंप वाहिनीद्वारे [(केंजळ ए. जी. (मिश्र)] वीज पुरवठा होतो. सदर वाहिनीवर उपकेंद्रात स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर (एसडीटी) जोडण्यात आलेला आहे. अश्या

ठिकाणी कृषीपंपाकरीता ३ फेज वीज पुरवठा ८ ते १० तास करण्यात येतो व इतर वेळेस घरगुती ग्राहकांसाठी सिंगल फेज वीज पुरवठा केला जातो. नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाळयात वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण जास्त असते, पण त्यावर तातडीने उपाययोजना करून कृषी वीज वाहिनी पुर्ववत करण्यात येते. अपिलार्थी यांचे शेतघराजवळ श्री. ओसवाल यांच्या बंगलो स्कीमसाठी त्यांनी स्वखर्चाने गावठाण वाहिणीवरून लघुदाब वाहिनी तयार केली असल्याने, सद्यस्थितीत तेथुन अर्जदाराचे कनेक्शन गावठाण वाहिनीत जाण्यासाठी ६ पोलची लघुदाब वाहिनी उभारणी करणे गरजेचे आहे. परंतू या कामासाठी कोणतीही योजना तुर्तास उपलब्ध नसल्याने सदरची वीज जोडणी करता येत नाही व त्याबाबत तसे अपिलार्थीस दिनांक २४ जुलै २०१८ रोजी पत्रान्वये कळविले होते. शिवाय, सदरील वीज वाहिनी स्वखर्चाने उभारणी करणेबाबत अपिलार्थी यांची सहमती नाही. शेतीपंप वाहिनीवरील वाडी / वस्तीवरील ग्राहकांना गावठाण वीज वाहिनीवर वीज पुरवठा करण्यासाठी कोणतीही योजना भविष्यात उपलब्ध झाल्यास तातडीने अपिलार्थीच्या घराची जोडणी गावठाण वाहिनीवर जोडण्याचे अंदाजपत्रक मंजूर करून सदर ग्राहकांची वीज जोडणी स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

५. दिनांक ८ ऑगष्ट २०१९ रोजी सुनावणी व्हिडीओ कॉन्फरंस च्या माध्यमाने घेण्यात आली. सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अभिवेदनामध्ये नमुद केलेले मुद्दे पुनश्च मांडले. त्याचप्रमाणे त्यांनी असेही नमुद केले की, अपिलार्थी हे शेतकरी आहेत. त्यांचा वीज पुरवठा हा वारंवार खंडीत होतो व २४ तासांपेक्षाही अधिक वेळ वीज पुरवठा खंडीत होण्याची वारंवारीता खुप आहे. त्यामुळे घरातील मुलांना रात्रीचा अभ्यास करता येत नाही. तसेच महिलांना स्वंयपाक करण्यासाठी व इतर अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. दिवसा वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर दिलेली तक्रार हि २४ तासानंतरच विचारात घेतली जाते. रात्री वीज पुरवठा खंडीत झाल्यावर तक्रारीचे फोन लाईनमन सर्वसाधारण घेत नाहीत. शेतीतील घरांचा वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर तक्रारीचे निवारण

करण्यासाठी कोणीही वाली नाही असे खेदाने नमुद केले. शेतीपंप वीज वाहिनींची देखभाल (Maintenance) चांगली करण्यात यावी, वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण नाममात्र असावे व वीज पुरवठा खंडीत झाल्यावर तातडीने दुरुस्त करण्यात यावा. तसेच अपिलार्थी यांचा वीज पुरवठा गावठाण फिडरवर वीज वाहिनीवर देण्यात यावा अशी विनंती अपिलार्थी यांनी केली.

६. सुनावणीदरम्यान प्रतिवादी महावितरण यांनी नमुद केले की, अपिलार्थी यांना वीज पुरवठा २२ केव्ही केंजळ ए. जी.(मिश्र) शेतीपंप वाहिनीवरून केला जातो. या वाहिणीची लांबी अंदाजे ३६ किमी असुन व ती वाहिणी डोंगरदऱ्याच्या दुर्गम भागातून जाते. त्यावर १४३ डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफॉर्मर आहेत. २२१४ कृषी ग्राहक व ४१८ बीगर कृषी ग्राहकांना त्या वाहिणीवरून वीज पुरवठा होतो. अपिलार्थी यांच्या तक्रारीचे गांभीर्य प्रतिवादी यांच्या लक्षात आले असुन त्यावर पुढील काळात योग्य ती खबरदारी घेण्यात येईल. देखभालीचा दर्जा आणखी वाढविण्यात येईल. जनमित्रांना योग्य त्या सुचना करण्यात येतील. ऑनलाईन तक्रार यंत्रणा आणखी लोकाभिमुख करण्यात येईल तसेच गावठाण फिडरवर वरील ग्राहकांचा वीज पुरवठा देता यावा यासाठी वरीष्ठांकडे पाठपुरवठा करण्यात येईल असे आश्वासीत करून प्रतिवादी यांनी विनंती केली की, अपिलार्थी यांचे अभिवेदन निकाली काढण्यात यावे.

निष्कर्ष व निर्णय

७. दोन्ही पक्षकारांचे म्हणने ऐकण्यात आले व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी यांचा वीज पुरवठा २२ केव्ही केंजळ ए. जी.(मिश्र) कृषीपंप वाहिनीवरून केला जातो. या वाहिनीची लांबी अंदाजे ३६ किमी असुन ती वाहिनी डोंगरदऱ्याच्या दुर्गम भागातून जाते. त्यावर १४३ डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफॉर्मर आहेत. २२१४ कृषी ग्राहक व ४१८ बीगर कृषी ग्राहकांना त्या वाहिनीवरून वीज पुरवठा होतो. अपिलार्थी यांना खंडीत वीज पुरवठ्याचा खूप त्रास होत आहे असे दिसते. २२

केव्ही केंजळ वाहिनीचा मागील सहा महिन्याच्या 'खंडीत वीज पुरवठा अहवालाचे' अवलोकन केले असता प्रतिमहिना १२ ते ४२ वेळा वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण असल्याचे निदर्शनास येते, यात लघुदाब वाहिनीवरील वीज पुरवठा खंडीत झाल्याचा कालावधी व संख्या उपलब्ध नाही. अपिलार्थी यांनी २४ तास वीज पुरवठयाची मागणी केली आहे. या मागणीसाठी अपिलार्थी यांची वीज जोडणी गावठाण फिडरवर जोडण्यासाठी सहा पोल लघुदाब वाहिनी उभारणी करण्याचे गरजेचे आहे. परंतू सद्यस्थितीत महावितरणकडे कोणतीही योजना / निधी उपलब्ध नाही असे महावितरणचे म्हणने आहे. ग्राहकांची तक्रार जनमित्र गांभीर्याने घेत नाहीत असे ही ग्राहकाचे म्हणने आहे.

८. वरील सर्व बाबींचा ऊहापोह केला असता असे सुचीत करण्यात येत आहे की, कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थी यांचा वीज पुरवठा गावठाण वीज वाहिनीवर जोडण्याची शक्यता पडताळून पाहून वरीष्ठांकडे प्रस्ताव पाठवावा. सदरच्या वाहिनीची योग्य ती देखभाल करण्यात येऊन वीज पुरवठा खंडीत होणार नाही याकडे महावितरणने विशेष लक्ष पुरवावे. वीज तक्रार नोंद व निवारण करण्याबाबत सुविधातील त्रुटीचा अभ्यास करून योग्य ती दक्षता घेण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

९. वरीलप्रमाणे अपिलार्थी यांचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आले.

१०. प्रतिवादी यांनी हा आदेश पारीत केल्यानंतर केलेला कामाचा अहवाल व वीज पुरवठा खंडीत झाला असल्यास त्यासंबधातील आकडेवारी (Interruption report) तीन महिन्यात या कार्यालयास पाठविण्यात यावी.

११. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाही.

सही/-
(दिपक लाड)
विद्युत लोकपाल (मुंबई)

खरी प्रत असल्याचे प्रमाणित
श्री. डी. एस. डुंबरे
सचिव
वि.नि.अ.